**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २१ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

- नागपुरातील हिंसाचार बाधित नंदनवन व कपिलनगर पोलीस ठाण्याचा हद्दीतील कर्फ्यू हटविला, कोतवाली, तहसील व गणेशपेठ मध्ये कर्फ्यू कायम, सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दुपारी दोन ते चार या कालावधीत शिथिलता.
- राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी, कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी समिती नेमल्याची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत माहिती.
- नागपूर महानगरपालिकेच्या चालू आर्थिक वर्ष 2024-25साठी एकूण जमाखर्च 5302 कोटी आणि 4603 एकूण खर्च यासह 698 कोटी शिलकीचा सुधारित अर्थसंकल्प सादर.
- विदर्भात आज बहुतांश जिल्ह्यात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट, तर उद्या चंद्रपूर आणि यवतमाळमध्ये ऑरेंज अलर्ट.

**नागपूर हिंसाचार**

नागपुरातील महाल-हंसापुरीत पसरलेल्या हिंसाचारानंतर नागपुर पोलिसांनी गेल्या 17 मार्चला शहरातील अकरा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लावली होती. मात्र, आता शहर पोलिसांनी नंदनवन आणि कपिलनगर पोलीस ठाण्याचा हद्दीतील संचारबंदी हटविली असुन सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दुपारी दोन ते चार या कालावधीत शिथिलता दिली आहे. मात्र, कोतवाली, तहसील व गणेशपेठ या तीनही पोलिस ठाण्यातील संचारबंदी कायम ठेवण्यात आली आहे. नागपूर शहर पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल यांनी हे निर्देश जारी केले आहेत. परिस्थिती बघून संचारबंदी शिथिल करण्यासाठीची चाचपणी करत असल्याचं त्यांनी सांगितलं....

*जे आम्ही शिथिलता दिली होती तसेच दोन जे पोलिस स्टेशन मधून काढलेले आहे. ते जे सिच्युएशनच्या आधारावर आपण केलेलं आहे आणि ते आपण पुढच्या निर्णय जसे सिचुएशन त्याप्रमाणे आपण घेऊ.*

**दरम्यान, या प्रकरणांमध्ये एकूण 99 जणांना अटक झाली असून या मध्ये जे व्हिडिओ सीसीटीव्ही तसेच सायबर सेलच्या तपासणीत गुन्हे करताना उघडकीस आले त्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावरील आरोप पडताळले जात आहे पोलीस निपक्षपणे कारवाई करत आहे असे देखील सिंघल यांनी स्पष्ट केलं.**

**शपथविधी**

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. चंद्रकांत रघुवंशी, दादाराव केचे, संजय केणेकर, संजय खोडके, संदीप जोशी यांना सभापती राम शिंदे यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला.**

**दाओस करार रोजगार निर्मिती**

**दाओसमध्ये झालेल्या करारांमुळे राज्यात १६ लाख रोजगार निर्मिती होणार असून, त्यादृष्टीनं राज्य सरकार या करारांची चोख अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या करारांच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांनी केलेले आरोप त्यांनी फेटाळून लावले. त्याउलट महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या करारांची अंमलबजावणी झालेली नाही असं ते म्हणाले. राज्यात ग्रामीण भागात स्टार्ट अपला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी नेक्स्ट डोअर स्टार्ट अप योजना सुरू केली जाणार आहे, याअंतर्गत १ लाख नवे स्टार्ट अप सुरू करण्याचं उद्दिष्ट समोर ठेवलं असल्याचं कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितलं. रायगड जिल्ह्यात महाड इथं बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा भवन सुरू करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.**

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उद्या अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर राहणार असून शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे आयोजित डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहतील. तत्पूर्वी ते डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करतील.

**प्रकाश आबिटकर दौरा**

राज्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर येत्या 23 आणि 24 मार्च रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, ते चिखलदरा ग्रामीण रुग्णालयाला भेट देतील. याशिवाय विविध ग्रामीण रुग्णालयांना ते भेट देणार असून, ते अमरावतीमधील खासगी डॉक्टरांसमवेत संवाद देखील साधतील.

**चंद्रशेखर बावनकुळे**

राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. या समितीत आणखी तज्ज्ञांचा समावेश केला जाईल आणि समितीनं दिलेल्या अहवालानुसार विधीमंडळात विधेयक मांडलं जाईल असं त्यांनी सांगितलं. विधानसभेच्या आज झालेल्या विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना चर्चेला घेतल्या गेल्या, त्यात यासंबंधीची सूचना गोपीचंद पडळकर यांनी उपस्थित केली होती. चंद्रपूर जिल्ह्यात जिवती तालुक्यातल्या वन जमिनी शेतकऱ्यांना देता याव्यात, यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू, वन विभागाला अन्य जमिनी देऊन या जमिनी सोडवून घेऊ असं आश्वासनही त्यांनी दिलं. राज्यातल्या अपूर्ण राहिलेल्या धरणांची कामं पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवला जाईल असं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, उत्तम जानकर यांनी मांडलेल्या लक्षवेधीला उत्तर देतांना सांगितलं.

**मनपा अर्थसंकलप**

नागपूर महानगरपालिकेच्या चालू आर्थिक वर्ष 2024 25 च्या साठी .एकूण जमाखर्च 5302 कोटी आणि 4603 एकूण खर्च यासह 698 कोटी शिलकीचा सुधारित अर्थसंकल्प महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक अभिजीत चौधरी

यांनी आज सादर केला. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये परिवहन विभागाला पीएमई बस सेवा त्याचप्रमाणे राज्य शासन, केंद्र शासन यांच्याद्वारे सुमारे 600 इलेक्ट्रिक बसचा ताफा मिळणार असून नागपूरच्या रिंग रोडवर इ-आरटीक्युलेटेड बसेसच्या माध्यमातून फ्लॅश चार्जिंग तंत्रज्ञानाद्वारे निरंतर बस सेवा चालू राहणार आहे यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितलं.

*माननीय नितीनजी गडकरी यांच्या संकल्पनेतन आपण आर.टी.क्यू.रिलेटेड बसेस जे आहे. त्यांच्या संदर्भामध्ये डी.पी.आर. तयार केलेला आहे आणि तो इंटर डिपार्टमेंटला पब्लिश झालेला आहे त्याची मान्यता जी आहे. ती MORTH कडं आपल्याकडे आलेली आहे अशी अपेक्षित आहे ह्या आर.टी.क्यू.रिलेटेड च्या बसेस आहे. यांचं कन्टीनुएसली जे मोमेन्ट असणार आहे ते आपल्या रिंगरोड वर असणार आहे यात पंचवीस रनिंग बसेस असणार आहेत आणि त्याचामधे आपण तीन स्पेर ठेवणार आहोत आणि त्या फ्लॅश चार्जिंग वर चालणार आहेत.*

याचप्रमाणे इलेक्ट्रिक वाहनांसाठी नागपूर शहरातील 11 ठिकाणी सार्वजनिक खाजगी भागीदारी द्वारे 11 चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत. सोमलवाडा येथे 3 कोटी 80 लाख रुपये च्या तरतुदीने क्लीन स्ट्रीट फूड हा प्रकल्प विकसित करण्यात येणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली. संपत्ती करा द्वारे 2024-25 या चालू आर्थिक वर्षात 11 हजाराच्या वर नवीन मालमत्ता कर निर्धारण कक्ष आणल्या असून पुढील आर्थिक वर्ष 2025 -26 करिता मालमत्ता करापासून 350 कोटी रुपयांचे उद्दिष्ट देखील निश्चित करण्यात आल्याची माहिती चौधरी यांनी दिली.

शेतमाल विक्री महोत्सव

शेतकऱ्यांनी आपल्या उत्पादनाच्या थेट विक्रीसाठी आणि बाजारपेठेच्या नवीन संधींसाठी जिल्हास्तरीय शेतमाल विक्री महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केले.

*येणाऱ्या 22 आणि 23 तारखेला आपला जिल्हास्तरीय शेतमाल महोत्सव आमच्या जिलामध्ये आम्ही आयोजित करणारा आहे. 22 तारखेला पूर्णपणे आम्ही चिया च्याबद्दल सगळ्या प्लॅन केल आहे, नियोजन केली आहे. त्यामध्ये चियाच खरेदी करणारे कंपनीचे येणार आहेत आणि आपल्या शेतकरीला त्याच्यासोबत चर्चा करायला या वर्षीच्या मालविक्री आणि पुढच्या वर्षीचे नियोजन करायला सुद्धा याचा एक चांगली संधी आहे आणि 23 तारखेला सगळ्या पिकांचा आम्ही घेणार आहे. शेतमाल सगळं आम्ही घेणार आहे.*

**या महोत्सवाचे आयोजन उद्या पासून अर्थात २२ आणि २३ मार्च २०२५ रोजी बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र, काटा रोड, वाशिम येथे सकाळी ९.०० ते रात्री ९.०० या वेळेत करण्यात आले आहे. १५० स्टॉल्स उभारले जाणार असून, धान्य, फळे, भाजीपाला, सेंद्रिय उत्पादने, कृषी प्रक्रिया उत्पादने आणि खाद्यपदार्थ थेट ग्राहकांना विक्रीसाठी उपलब्ध असतील.**

**रेल्वे**

**दिनांक 21 मार्च 2025 रोजी वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक आणि सहाय्यक विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता यांनी वर्धा आणि पुलगाव स्थानकांचे सुधारणेच्या दृष्टीने व्यापक निरीक्षण केले. तसेच, पुलगाव स्थानकावर अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.**

**नवतेजस्विनी**

**राज्य सरकारच्या महिला आणि बाल विकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाला पन्नास वर्षे पूर्ण झाली असून माविमच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त नवतेजस्विनी महाराष्ट्र महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत बचत गटातील महिलांनी उत्पादित वस्तूची जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शनी आणि विक्री आज पासून ते 23 मार्च पर्यन्त बुटीबोरी एमआय डीसी इथं आयोजित करण्यात आली असून कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर यांच्या हस्ते आज सायंकाळी होत आहे.**

**हवामान**

विदर्भातील पूर्व भागातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपूरसह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये अलर्ट जारी करण्यात आला असून पश्चिम विदर्भातील अमरावती आणि यवतमाळ मध्ये देखील अलर्ट देण्यात आला आहे. याशिवाय उद्या यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मेघगर्जनेसह पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  दरम्यान लोकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने केले आहे. येत्या काही तासात नागपूर, अमरावती आणि यवतमाळ या ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता असून चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय गडचिरोली इथं पर्जन्यवृष्टीसह काही तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे.

******